# औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रियेकडे दुर्लक्ष

## नाशिकमध्ये नऊ कारखाने बंद, जल प्रदूषणामुळे कारवाई

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** दूषित पाण्यामुळे नागरिकांना त्वचेच्या विकारांना सामोरे जावे लागल्याची बाब समोर आल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने औद्योगिक सांडपाण्यावर योग्यप्रकारे प्रक्रिया न केल्याचा ठपका ठेवत अंबड औद्योगिक वसाहतीतील नऊ कारखाने बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. बाधित क्षेत्रातील कुपनलिकांचा कुणीही वापर करू नये म्हणून त्याही बंद करण्यात आल्या आहेत.

अंबड औद्योगिक वसाहतीलगतच्या निवासी भागात कुपनलिकांमधून अत्यंत दूषित, उग्र वासाचे व पिवळसर रासायनिक पाणी येत आहे. काही कंपन्या रासायनिक पाणी प्रक्रियेविना जमिनीत सोडतात. ते जलस्त्रोतांद्वारे थेट नंदिनी नदीत मिसळत असल्याची तक्रार पर्यावरणप्रेमींनी केली होती. त्यामुळे आसपासचे रहिवासीच नाही तर, शहरातील पर्यावरण आणि नद्यांना धोका निर्माण झाल्याकडे त्यांनी लक्ष वेधले होते. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी दत्तनगर, मारुती संकुल, तुळजाभवानी परिसरातील बाधित क्षेत्राची पाहणी करीत कारवाईचे निर्देश दिले होते. दूषित पाण्यामुळे नागरिकांना त्वचारोगासह आरोग्याच्या समस्या उद्भवल्याचे स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिपेंद्र कुशवाह यांनी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मनपा आयुक्त मनिषा खत्री आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक घेऊन आढावा घेतला.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अंबड औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची तपासणी सुरू केली. त्यात सांडपाण्यावर योग्य प्रकारे प्रक्रिया न करणारे नऊ कारखाने बंद करण्याची कारवाई केली जात असल्याची माहिती उपप्रादेशिक अधिकारी प्रणव पखाले यांनी दिली. यात इसान मेटल ट्रीटर्स, श्री साई इंटरप्रायजेस, मॅक्स सरफेस ट्रीटमेंट आणि विजय इंडस्ट्रीज यांचे उत्पादन थांबविण्यात आले आहे. या उद्योगांची वीज व पाणी पुरवठाही खंडित करण्यात आला. मायक्रॉन इंडस्ट्रीजवर अशीच कारवाई प्रस्तावित असून उर्वरित चार कंपन्यावर याच कारणास्तव उत्पादन बंद करण्याची नोटीस बजावली जात असल्याचे पखाले यांनी सांगितले. कारवाई झालेल्यांमध्ये मुख्यत्वे प्लेटिंग उद्योगाचा समावेश आहे. औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रियेच्या विहित निकषांची पूर्तता होईपर्यंत संबंधितांना उत्पादन सुरू करता येणार नाही.

**पाणी पुरवठ्यासाठी वाढीव क्षमतेच्या नळ जोडण्या**

एमआयडीसीतील प्लेटिंग उद्योगाचे दुषित पाणी विहिरी व हातपंपात उतरल्याने पाण्याचा रंग पिवळा होऊन ते दुषित झाले. या पाण्याचा वापर केल्यामुळे नागरिकांना त्वचेचे विकार झाल्याचे महापालिकेने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर, परिसरातील हातपंप, कुपनलिकाचा वापर रोखण्यासाठी त्या बंद करण्यात आल्या आहेत. प्रभावित भागात नळ जोडण्या कमी आकारमानाच्या असून तिथे सदनिकेच्या संख्येनुसार योग्य आकारमानाच्या जोडण्या दिल्या जाणार आहेत. परिसरातील सोसायट्यांमध्ये दैनंदिन वापराच्या पाण्यासाठी दोन ते पाच हजार लिटरच्या टाक्या ठेवून टँकरने त्या भरून देण्याची व्यवस्था केली जात आहे.

# समृद्ध पंचायत राज अभियानचा शुभारंभ

## नाशिकमध्ये मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सरपंच परिषद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** राज्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना त्यावर मात करण्यासाठी ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये सरपंच परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५-२६ अंतर्गत पुरस्कारांचे वितरण, तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२६ चा शुभारंभ करण्यात येणार आहे. या सरपंच परिषदेत दुष्काळावर मात करण्यासह समृद्ध गावांचा संकल्प साकारण्यासाठी विविध उपाययोजनांवर मंथन होणार आहे.

रविवारी सकाळी साडेदहा वाजता हनुमाननगर परिसरातील युथ फेस्टिव्हल मैदानावर हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे आदी उपस्थित राहणार आहेत. या परिषदेनिमित्त राज्यातील तब्बल १० हजार सरपंच, ग्रामसेवक आणि लोकप्रतिनिधी एकत्र येणार आहेत. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या पुढील टप्प्याचा प्रारंभ करण्याबरोबरच दुष्काळावर कायमस्वरूपी उपाययोजना शोधण्याच्या दृष्टीने या परिषदेत चर्चा होणार आहे.

**पाणी नियोजनावर मंथन**

राज्यात दुष्काळी परिस्थितीचे सावट असताना आयोजित करण्यात आलेल्या या सरपंच परिषदेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गावपातळीवर पाण्याचे नियोजन कसे करावे, उपलब्ध जलसाठ्याचा नियोजनपूर्वक वापर कसा करावा आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, यासह विविध मुद्द्यांवर सरपंच आणि ग्रामसेवकांशी थेट चर्चा होणार आहे. दुष्काळी परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याबाबतही यावेळी सरपंचांशी संवाद साधला जाईल. पाणी टंचाईच्या काळात केवळ टँकर, चारा किंवा अन्य तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून राहण्याऐवजी गावाच्या पाण्याची गरज, उपलब्धता, साठवणूक आणि भविष्यातील मागणी यांचा शास्त्रीय पद्धतीने विचार करणे आवश्यक आहे. गावपातळीवर दीर्घकालीन नियोजनाची गरज या संवादातून अधोरेखित केली जाणार आहे.

# कालिका देवी यात्रोत्सवासाठी वाहतुकीत बदल

## २० ऑक्टोबरपर्यंत निर्बंध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री कालिका देवी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन वाहतूक विभागाने वाहतुकीत बदल केले आहेत.

रविवारपासून २० ऑक्टोबरपर्यंत मंदिर परिसरातील काही प्रमुख रस्ते ठरावीक कालावधीसाठी सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहणार आहेत. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा अवलंब करावा, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे.

नाशिक शहरात सिंहस्थ कुंभमेळ्यासह विविध विकासकामांसाठी सुरू असलेल्या रस्त्यांच्या खोदकामांमुळे नागरिक त्रस्त आहेत. श्री कालिका देवी मंदिराजवळील जुना आग्रा रोडवरही जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. ही कामे तात्पुरती डागडुजी करून बंद करावीत, अशी मागणी कालिका देवस्थानच्या वतीने करण्यात आली होती. दरम्यान, रविवारपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून, या काळात मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे मंदिर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी वाहतूक विभागाने नियोजन केले आहे. तसेच भाविकांच्या वाहनांसाठी वेगवेगळ्या भागात वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. महामार्ग बसस्थानकातून सुटणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसचे मार्गही बदलण्यात आले आहेत. उत्सव काळात मंदिर परिसरात दुकाने थाटली जात असल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. तसेच अनुचित प्रकार टाळण्यासाठी वाहनचालकांनी वाहतूक विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद**

गडकरी सिग्नल ते हॉटेल रुचीपर्यंत दोन्ही बाजूंच्या मार्गांवर तसेच चांडक सर्कल ते हॉटेल संदीपपर्यंत येणाऱ्या-जाणाऱ्या दोन्ही बाजूंच्या मार्गांवर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा. नाशिक रोड आणि इंदिरानगरकडे जाणाऱ्या तसेच तेथून येणाऱ्या नागरिकांनी मायको सर्कल आणि एबीबी सर्कल येथील पर्यायी मार्गांचा अवलंब करावा.

**भगूरमध्येही वाहतूक वळविली**

भगूर येथील रेणुकादेवी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त यात्रा भरणार असल्याने ११ ते २० ऑक्टोबर या कालावधीत रेस्ट कॅम्प रोडवरील केंद्रीय विद्यालय ते जोशी हॉस्पिटल या मार्गावर सर्व प्रकारची वाहने, हातगाड्या, एसटी बस आणि दुचाकींना प्रवेश बंद राहणार आहे. या काळात रेस्ट कॅम्प, जोशी हॉस्पिटल, स्नेहनगर, पेरूमल मार्ग, टेम्पल हिल रोड, जोझिला मार्ग आणि केंद्रीय विद्यालय मार्गाने वाहतूक वळविण्यात येणार आहे. तसेच भगूर नाका क्रमांक दोन येथून डावीकडे वळून मल्हारीबाबा नगर, बॉर्न्स स्कूल रोड, शिंगवे बहुला, धोंडी रोड, खंडेराव टेकडी, डेअरी फार्म, आनंद रोड आणि संसरी नाका या मार्गाने वाहने ये-जा करतील.


**आरबीएल बँक लि.**

RBL BANK apno ka bank

नोंदणीकृत कार्यालय: १ली लेन, शाहूपुरी, कोल्हापूर-४१६००१
नॅशनल ऑपरेटिंग सेंटर: ९वा मजला, टेक्नीप्लेक्स-१, वीर सावरकर उड्डाणपुलाजवळ, गोरेगाव (पश्चिम) मुंबई-४०००६२.

**सोन्याचा लिलाव व आमंत्रण सूचना**

खाली नमूद केलेल्या कर्जदाराला, त्यांनी आरबीएल बँक लिमिटेड यांच्याकडून सोन्याच्या दागिन्यांवर घेतलेल्या कर्ज सुविधेअंतर्गत ("सुविधा") मार्जिन रक्कम भरण्यासाठी मार्जिन कॉल नोटीस बजावण्यात आली आहे. कर्जदार सुविधेअंतर्गत मार्जिन रक्कम परतफेड करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, आम्हाला खालील रकान्यात नमूद केलेल्या तारखांना तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणे भाग पडले आहे.
सदर या लिलावातून कोणतीही अतिरिक्त रक्कम वसूल झाल्यास, ती संबंधित कर्जदाराला परत केली जाईल, आणि लिलावानंतर तूट राहिल्यास, उर्वरित रक्कम योग्य कायदेशीर कार्यवाहीद्वारे कर्जदाराकडून वसूल केली जाईल. आरबीएल बँकेला पूर्वसूचना न देता खालील खाते लिलावातून काढून टाकण्याचा अधिकार आहे. याव्यतिरिक्त, आरबीएल बँक कोणतीही पूर्वसूचना न देता लिलावाची तारीख बदलण्याचा अधिकार राखून आहेत.

| अ. क्र. | खाते क्रमांक | शाखेचे नाव | कर्जदाराचे नाव | सोन्याच्या दागिन्यांची माहिती (ग्रॅममध्ये) | | सोन्याच्या लिलावाचे ठिकाण | शाखा व्यवस्थापकाचे नाव व मोबाईल क्र. | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ८०९०१०६४५१६६ | नाशिक | सारिका नरेश देसाई | एकूण_ठोक_वजन | ११४.२ | आरबीएल बँक लि., नाशिक शाखा, दुकान क्रमांक जी-०१, तळमजला, सह्याद्री बिझनेस पार्क इन, मिको सर्कलजवळ, नाशिक - ४२२ ००२. | भावेश अनंतकुमार शहा ८३८०००३३५२ | दि. १४-१०-२०२६ रोजी दुपारी ०२.०० वा. ते ०३.०० वा. |
| | | | | संपूर्ण_अशुद्धता | ४.०० | | | |
| | | | | एकूण_स्टोन_वजन | १.०४ | | | |
| | | | | एकूण_नेट_वजन | १०९.१६ | | | |

इच्छुक बोलीदारांनी शाखा व्यवस्थापकांशी संपर्क साधावा.
सविस्तर अटी व शर्तींसाठी, कृपया आरबीएल बँकेच्या संबंधित शाखांना भेट द्या.
ठिकाण: नाशिक
दिनांक: ११-१०-२०२६

अधिकृत अधिकारी
आरबीएल बँक लि.


# मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्यासाठी टॉर्च फेरी

**लोकसत्ता प्रतिनिधी**




**नाशिक :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, त्यांच्यावर कारवाई करत त्यांना तातडीने अटक करावी या मागणीसह अन्य मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी विविध सामाजिक, राजकिय आणि लोकशाहीवादी पक्षाच्या वतीने शनिवारी टॉर्च फेरी काढण्यात आली.

भारतीय संविधानाने प्रत्येक पात्र नागरीकाला दिलेला मतदानाचा अधिकार हा लोकशाही व्यवस्थेचा मुलभूत आधार आहे. मात्र एसआयआर प्रक्रियेच्या माध्यमातून कोट्यवधी नागरिकांच्या नावावर आणि त्यांच्या मतदानाच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला. या प्रक्रियेमुळे गरीब, कष्टकरी, अल्पसंख्याक, दलित, आदिवासी, भटके विमुक्त, महिला आणि वंचित घटकांवर अन्यायकारक परिणाम होण्याची गंभीर शक्यता असल्याकडे मोर्चेकऱ्यांनी लक्ष वेधले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्तीची प्रक्रिया, निवडणूक आयोगाची कार्यपध्दती आणि निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत निवडणूक आयोगाने जनतेसमोर स्पष्ट आणि विश्वासार्ह माहिती ठेवणे आवश्यक आहे. एसआयआर प्रक्रियेमुळे ज्यांचे मतदानाचे हक्क बाधित झाले आहेत, त्यांचे हक्क तातडीने बहाल करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. फेरीदरम्यान आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. या फेरीमुळे काही काळ वाहतुक कोंडीचा सामना करावा लागला.

# सप्तश्रृंग गडावर खाद्यपदार्थांची तपासणी

**नाशिक :** महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र सप्तशृंग गडावर नवरात्रोत्सवासाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने विशेष तपासणी मोहीम हाती घेण्याची तयारी केली आहे. भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, तसेच अन्नविषबाधेच्या घटना टाळता याव्यात, यासाठी गडावरील हॉटेल्स, भोजनालये, मिठाई दुकाने, पेढा व प्रसाद विक्री केंद्रांसह खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करण्यात येणार आहे.

नवरात्रोत्सवात श्री सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह विविध भागांतून भाविक गडावर येतात.

या काळात खाद्यपदार्थांची विक्री वाढत असल्याने अन्नपदार्थांची गुणवत्ता आणि स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. अन्नपदार्थ तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल, साठवणुकीची पद्धत, तयार अन्नपदार्थ हाताळण्याची प्रक्रिया, स्वच्छ भांडी व उपकरणांचा वापर आणि आस्थापनांमधील स्वच्छतेची तपासणी केली जाणार आहे. तसेच अन्नपदार्थ धूळ, माश्या आणि इतर कीटकांपासून सुरक्षित ठेवले जातात का, याचीही पडताळणी करण्यात येईल. ही मोहीम सहआयुक्त मंगेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहायक आयुक्त सं. शि. देवरे यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येणार आहे. अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत लागू नियमांचे पालन होत आहे किंवा नाही, याची खातरजमा केली जाणार आहे.

**पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेवर लक्ष**

अन्नपदार्थ तयार करणे, स्वयंपाक, भांडी धुणे आणि ग्राहकांना पिण्यासाठी वापरले जाणारे पाणी स्वच्छ व पिण्यायोग्य असणे आवश्यक आहे. दूषित पाण्यामुळे संसर्गजन्य आणि अन्नजन्य आजार होण्याची शक्यता असल्याने खाद्य व्यावसायिकांनी सुरक्षित पाण्याचा वापर करावा. आवश्यकतेनुसार पाणी तपासणी अहवालही उपलब्ध ठेवावा, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवात भाविकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड केली जाणार नसून, अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# त्र्यंबकेश्वर, बेळगाव ढगा, खंबाळेतील वीज पुरवठा आज बंद

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक –** महापारेषणच्या सातपूर विद्युत उपकेंद्रातून निर्गमित होणाऱ्या वाहिनीवर असलेल्या बेळगाव ढगा आणि खंबाळे या दोन विद्युत उपकेंद्राचा संपूर्ण वीज पुरवठा कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणाऱ्या विविध विद्युत कामांसाठी रविवारी सकाळी सात ते सायंकाळी सहा या वेळेत बंद राहणार आहे. संबंधित ग्राहकांनी याची नोंद घेवून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

उपरोक्त कामांमुळे बेळगाव ढगा गाव, संस्कृती हॉटेल, महिरावणी ते त्र्यंबकेश्वर महामार्ग, वासळी गाव व परिसर, जे. के. पावडर आणि मॉन्टेक्स फायबर ग्लास, पिंपळगाव बहुला गाव आणि परिसर, जाधव संकुल, केवल पार्क, म्हाडा परिसर, संदीप युनिव्हर्सिटी, महिरावणी गाव आणि परिसर, पिंपळगाव गरुडेश्वर, खंबाळे गाव, तळेगाव, अंजनेरी, जातेगाव, तळेगाव, ग्रेप काउंटी, मुळेगाव, दहेगाव, शिवणगाव, गणेशगाव नाईक, गणेशगाव त्र्यंबक, पिंपळगाव बहुला या भागातील वीज पुरवठा बंद राहणार आहे. हे काम नियोजित वेळेअगोदर पूर्ण झाल्यास किंवा तांत्रिक कारणास्तव वेळ लागल्यास त्यानुसार वीज पुरवठा सुरू करण्यात येईल. तरी संबंधित ग्राहकांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणच्या नाशिक शहर विभाग दोनकडून करण्यात आले आहे.

# पक्षीमित्र दिगंबर गाडगीळ यांचे निधन



**नाशिक –** पर्यावरण संवर्धन, विज्ञान प्रसारासाठी आयुष्य वेचणारे येथील सामाजिक कार्यकर्ते, पक्षीमित्र दिगंबर गाडगीळ (९२) यांचे वृद्धापकाळाने पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली असा परिवार आहे.

गाडगीळ हे भारतीय आयुर्विमा महामंडळात (एलआयसी) कार्यरत असतानाच पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्नशील होते. त्यांनी पक्षी मित्र मंडळाची स्थापना करून समविचारी व्यक्तींना एकत्र आणले. त्यांच्या पुढाकाराने पक्ष्यांसंदर्भातील मोठे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. त्यांनी 'अमृत' मासिकाच्या कामात योगदान दिले. याशिवाय विविध मासिकांसाठी लेखनही केले. समाजात विज्ञानविषयक माहितीचा प्रसार व्हावा, या उद्देशाने त्यांनी विज्ञानविषयक लेखन करणाऱ्यांचा 'सायन्स फिचर्स' हा गट सुरू केला. दादासाहेब फाळके फिल्म सोसायटीचे ते संस्थापक सचिव होते. विविध सामाजिक उपक्रमांत कार्यरत असतानाच त्यांनी होमिओपॅथीचाही अभ्यास केला. ग्रंथालय संघाचे पदाधिकारी म्हणूनही काम पाहिले. सार्वजनिक वाचनालय, नाशिकच्या कार्यकारी मंडळातही त्यांनी योगदान दिले. नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्याच्या विकासासाठी आणि संवर्धनासाठी त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. त्यांच्या पर्यावरणविषयक कार्याची दखल घेत नेचर क्लब ऑफ नाशिकच्या वतीने त्यांना 'पर्यावरण मित्र' पुरस्काराने गौरविण्यात आले होते.


पंजाब नैशनल बैंक भारत सरकारचा उपक्रम
pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

**एआरएमबी, नाशिक**
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

**सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस**

**स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस**
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

**सेक्युरिआयझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट अॅक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात**

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

| लॉट क्र. | शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे | अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३०.०९.२०२६ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक | अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम | लिलावाचे दिनांक व वेळ | कर्जदारांच्या बोझ्याचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शाखा: PNB- पिंपळगण (B)-119010 कर्जदार:जे के औद्योगिक सेवा नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता:** प्रा.सुधाकर गणपतराव कापडी, सर्वेक्षण क्रमांक 670-ए/2 पैकी एन.ए. औद्योगिक भूखंड क्रमांक 112 आणि 113 श्री समर्थ सहकारी औद्योगिक वसाहत लि., मुखेड रोड, गाव पिंपळगाव बसवंत, तालुका निफाड, जिल्हा नाशिक, महाराष्ट्र-422209 **2. श्री सुधाकर गणपतराव कापडी (प्रोप्रायटर)** पत्ता:दुकान क्रमांक 16, औद्योगिक वसाहत, पिंपळगाव एमआयडीसी मुखेड रोड, पिंपळगाव (बु), ता. निफाड, जिल्हा- नाशिक- 422209 **3. श्री सुधाकर गणपतराव कापडी (प्रोप्रायटर)** घराचा पत्ता: मल्हार संभाजी कॉलनी, शिवाजी नगर, पिंपळगाव (बु), ता- निफाड, जिल्हा- नाशिक- 422209. | सर्व्हे क्रमांक ६७०-ए/२ मधील, २५० चौ.मी. क्षेत्रफळाचा अकृषिक (N.A.) औद्योगिक भूखंड क्रमांक ११२ आणि २५० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड क्रमांक ११३ (एकूण क्षेत्रफळ ५०० चौ.मी.), तसेच त्यावर असलेले अंदाजे २२८ चौ.मी. क्षेत्रफळाचे औद्योगिक शेड; 'श्री समर्थ सहकारी औद्योगिक वसाहत लि.', मुखेड रोड, गाव पिंपळगाव बसवंत, तालुका निफाड, जिल्हा नाशिक **सीमा: उत्तर:** भूखंड क्रमांक ८८, ८९ आणि ९० **दक्षिण:** १५ मीटर रुंद रस्ता **पूर्व:** भूखंड क्रमांक ११४ **पश्चिम:** भूखंड क्रमांक १११मालमत्ता क्रमांक **प्रॉपर्टी आयडी: PUNB008288W2354839279** | अ) ०९.०३.२०२६ ब) रु. १,६७,४३,०४७.६६ /- + इतर व्याज + खर्च क) २१-०५-२०२६ ड) सांकेतिक ताबा | अ) रु. ६०.६३ लाख ब) रु. ६.०६३ लाख (२७.१०.२०२६) क) रु. ०.५० लाख | दि. २७.१०.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत | माहित नाही |
| २. | **शाखा : पीएनबी-ओझर (२८०३००) कर्जदार:** १. **मयत शांताराम कोंडीबा खंडारे** **मयत शांताराम कोंडीबा खंडारे यांच्या पत्नी कायदेशीर वारस श्रीमती मनीषा शांताराम खंडारे** पत्ता: फ्लॅट क्रमांक ०६, दुसरा मजला, प्लॉट नंबर ०९ वर स्थित "प्रसाद प्लाझ्झा अपार्टमेंट" मध्ये, क्र. नं. २४०/१-१/२, बजाज शोरुमच्या मागे, सोहम हॉस्पिटल जवळ, लोकायत वाचनालय आणि अभ्यासिका जवळ, शिवाजी नगर, वैदूवाडी, स्नेह नगर , दिंडोरी रोड समोर, गाव म्हसरूळ, ता. आणि जि. नाशिक-422004. २. **मयत शांताराम कोंडीबा खंडारे यांचा मुलगा कायदेशीर वारस श्री भावेश शांताराम खंडारे** पत्ता: फ्लॅट क्रमांक ०६, दुसरा मजला, प्लॉट नंबर ०९ वर स्थित "प्रसाद प्लाझ्झा अपार्टमेंट" मध्ये, क्र. नं. २४०/१-१/२, बजाज शोरुमच्या मागे, सोहम हॉस्पिटल जवळ, लोकायत वाचनालय आणि अभ्यासिका जवळ, शिवाजी नगर, वैदूवाडी, स्नेह नगर , दिंडोरी रोड समोर, गाव म्हसरूळ, ता. आणि जि.नाशिक-422004. ३. **मयत शांताराम कोंडीबा खंडारे यांचा मुलगी कायदेशीर वारस श्रीमती प्रांजल शांताराम खंडारे** पत्ता: फ्लॅट क्रमांक ०६, दुसरा मजला, प्लॉट नंबर ०९ वर स्थित "प्रसाद प्लाझ्झा अपार्टमेंट" मध्ये, क्र. नं. २४०/१-१/२, बजाज शोरुमच्या मागे, सोहम हॉस्पिटल जवळ, लोकायत वाचनालय आणि अभ्यासिका जवळ, शिवाजी नगर, वैदूवाडी, स्नेह नगर , दिंडोरी रोड समोर, गाव म्हसरूळ, ता. आणि जि.नाशिक-422004. | फ्लॅट क्रमांक ०६, दुसरा मजला, "प्रसाद प्लाझ्झा अपार्टमेंट" मध्ये, प्लॉट क्रमांक ०९, सीनियर क्रमांक २४०/१-१/२, बजाज शोरुमच्या मागे, सोहम हॉस्पिटलजवळ, लोकायत वाचनालय आणि अभ्यासिका जवळ, शिवाजी नगर, वैदू वाडी, स्नेहा नगर, दिंडोरी रोडजवळ, गाव म्हसरुळ, ता. आणि जिल्हा नाशिक-४२२००४. **मालकी हक्क : शांताराम कोंडिबा खंदारे बांधकामक्षेत्रफळ-७४.४४चौ. मी. चतुःर्सिमा फ्लॅट क्रमांक-०६: उत्तर:** मोकळी जागा आणि कॉलनी रस्ता, **दक्षिण:** जिना **पूर्व:** मोकळी जागा आणि कॉलनी रस्ता **पश्चिम:** मोकळी जागा **मालमत्ता आयडी - PUNB5EK10478454** | अ) १४/०७/२०२२ ब) रु. २०,०३,३३२.३७ /- व अधिक व्याज आणि खर्च क) २३/०९/२०२२ ड) सांकेतिक ताबा | अ) रु. ३०.४४ लाख ब) रु. ३.०४४ लाख (२७/१०/२०२६) क) रु. ०.२५ लाख | दि. २७.१०.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत | माहित नाही |

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, 27.10.2026 @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर https://baanknet.com वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया www.pnb.bank.in. आणि https://baanknet.com ही वेबसाईट पाहावी

दिनांक - ११.१०.२०२६
स्थळ - नाशिक

**टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य**

स्वाक्षरी/-
**श्री. शैलेश कुमार शेंडे**
अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)